वार्ता टिपण दि. १२/०७/२०१८

## गोवा येथून ऑडी कार भाड्याने घेवून, सदर गाडी विक्री करण्याचे प्रयत्नात असलेल्या चालकास खंडणी विरोधी पथकाने २४ तासात पकडले.

गुन्हे शाखा, खंडणी विरोधी पथकाचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक, श्री. रघुनाथ जाधव यांच्या मार्गदर्शनाखाली दि. १२/०७/२०१८ रोजी राहुल घुगे, पोलीस उप निरीक्षक, सपोफौ कोंढरे, पो.हवा. ५४३ गरुड, पो.हवा. ५५१० मगर, पो.शि १२०४४ बनकर असे चेन स्नॅचींग होवू नये म्हणून वरिष्ठांच्या आदेशाप्रमाणे पेट्रोलींगकामी फिरत असताना, फिरत-फिरत ते बंडगार्डन पो.स्टे. चे हद्दीत न्यु पुना क्लब रोडवर आले असता, त्यांना एक ऑडी कंपनीची कार नं. जिए-०३-पी-२९२४ ही संशयास्पदरित्या फिरताना दिसली म्हणून श्री. घुगे यांनी स्टाफचे मदतीने सदरची गाडी अडवली. त्यानंतर गाडी मध्ये ड्रायव्हींग सिटवर असणाऱ्या इसमास त्याचे नाव पत्ता विचारता त्याने त्याचे नाव आशिष विजय डे, वय-३५ वर्ष, धंदा-व्यापार, रा. जे.डब्ल्यु. जलाली पट्टी, नवी वस्ती, वाराणसी, उत्तरप्रदेश असे सांगितले. त्याच्याकडे गाडीचे कागदपत्रा बाबत विचारपूस केली असता त्याच्याकडे गाडीचे कागदपत्र नसल्याचे सांगितले. यास्तव सदर इसमाकडे सखोल चौकशी करता त्याने सदर ऑडी कार बागा, कलंगुट, गोवा येथून फसवणूकीने भाडे तत्त्वार घेवून त्याची पुणे किंवा मुंबई येथे विक्री करणार असल्याचे सांगितल्याने सदरची गाडी दोन पंचा समक्ष सविस्तर पंचनाम्याने जप्त करुन ताब्यात घेतलेली आहे. सदर गाडीचा वर नमुद इसमाने अफरातफर केली म्हणून कलंगुट पो.स्टे., गोवा येथे गु.र.नं. १२४/१८ भा.दं.वि.क. ४०६ प्रमाणे गुन्हा दाखल असुन सदरचा गुन्हा हा वर नमुद अधिकारी व कर्मचारी यांनी २४ तासाच्या आत वर नमुद आरोपीस किं.रु. ४२,००,०००/- ची वर नमुद गाडीसह पकडून सदरचा गुन्हा उघडकीस आणला आहे. सदर इसमास गोवा पोलीसांच्या ताब्यात देण्यात आले आहे.

**वरील कारवाई ही गुन्हे शाखेचे मा. अपर पोलीस आयुक्त, श्री. प्रदिप देशपांडे सो, मा. पोलीस उप-आयुक्त, श्री. पंकज डहाणे सो, सहा. पोलीस आयुक्त श्री. समिर शेख सो, यांचे मार्गदर्शनाखाली खंडणी विरोधी पथकाचे पोलीस निरीक्षक श्री. रघुनाथ जाधव, पोलीस उप निरीक्षक श्री राहुल घुगे, पोलीस कर्मचारी भाऊसाहेब कोंढरे, प्रमोद मगर, रमेश गरुड, नारायण बनकर यांनी केली आहे.**